| | |
|---|---|
| MHPU260030632019 | **दाखल दिनांक** – ०३/**०७/२०१९**<br>**नोंदणी दिनांक** – ०५/०७/**२०१९**<br>**निकाल दिनांक** – **०६**/**०८**/२०**२६**<br>**कालावधी** – ०७ **व. ०१ म. ०२ दि.** |

**(भाग – अ)**

**<u>४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात वडगांव मावळ, पुणे</u>**

**(पिठासन अधिकारी :- व्ही. आर. डोईफोडे)**

**नि.फौ.ख.क्र.३८१/२०१९**

**नि.क्र.**

**अभियोगपक्ष - महाराष्ट्र शासन,**
**पोलीस स्टेशन अधिकारी,**
**तळेगाव एम आय डी सी पोलीस स्टेशन, पुणे**
**(गु.र.क्र.३५७/२०१८)**

**अभियोगपक्षातर्फे - सहाय्यक सरकारी अभियोक्ता -**
**श्री. एस. एस. पवार**

**-<u>विरुध्द</u>-**

**आरोपी क्र. १ - १) अमिर ईलाई शेख,**
वयः२९ वर्षे, व्यवसायः ड्रायव्हर.
रा. रावेत, मळेकर वस्ती देहुरोड, ता.मावळ, जि.पुणे.

**२) सागर विजय ओव्हाळ,**
वयः३८ वर्षे, व्यवसायः कन्सट्रक्शन,
रा. मु. पो. पुनावाला, ता. मुळशी, जि.पुणे.

**३) नवनाथ यशवंत लोखंडे,**
वयः४२ वर्षे, व्यवसायः बिल्डर,
रा. किवळेगाव, ता.मावळ, जि.पुणे.

**४) सुजित सुरेश भालेराव,**
वयः ४१ वर्षे, व्यवसायः बिल्डर,
रा. मु. चिंचोली, पो. देहुरोड, जि.पुणे.

**५) स्वप्नील बाळासाहेब ओव्हाळ,**
वयः ३२ वर्षे, व्यवसायः ड्रायव्हर,
रा. मु. पो. ओव्हाळ वस्ती पुनावाले, ता.मुळशी, जि.पुणे.

**आरोपी तर्फे विधिज्ञ - श्री. तनवीर जहागीरदार,**

**(भाग – ब)**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख** | दि.०७/०९/२०१७ |
| **फिर्याद दिल्याची तारीख** | ११/०९/२०१७ |
| **गुन्हयाचा तपशील दाखल तारीख** | २१/११/२०२५ |
| **पुरावा सुरु झाल्याची तारीख** | ०६/०८/२०२६ |
| **न्यायनिर्णयासाठी प्रकरण ठेवल्याची तारीख** | ०६/०८/२०२६ |
| **न्यायनिर्णयाची तारीख** | ०६/०८/२०२६ |
| **आरोपीला शिक्षा ठोठावली असेल तर, त्याची तारीख** | निरंक |

**आरोपींचे तपशील)**

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | आरोपीवर ठेवलेले दोषारोप | आरोपीला निर्दोष किंवा दोषी ठरविल्याची | शिक्षा लादलेला असल्यास | शिक्षा वजावट केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **तारीख** | | |
| **१.** | **अमिर ईलाई शेख,** | २१/०९/२०१७ | २२/०९/२०१७ | भा.दं.वि. कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष ठरविल्याची तारीख ०६/०८/२०२६ | निरंक | निरंक |
| **२.** | **सागर विजय ओव्हाळ,** | २१/०९/२०१७ | २२/०९/२०१७ | भा.दं.वि. कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ अन्वये | ०६/०८/२०२६ | निरंक | निरंक |
| **३.** | **नवनाथ यशवंत लोखंडे,** | २१/०९/२०१७ | २२/०९/२०१७ | भा.दं.वि. कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ अन्वये | ०६/०८/२०२६ | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **४.** | **सुजित सुरेश भालेराव,** | २१/०९/२०१७ | २२/०९/२०१७ | भा.दं.वि. कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ अन्वये | ०६/०८/२०२६ | निरंक | निरंक |
| **५.** | **स्वप्नील बाळासाहेब ओव्हाळ,** | २१/०९/२०१७ | २२/०९/२०१७ | भा.दं.वि. कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ अन्वये | | | |

**(भाग – क)**

**(अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी)**

| **साक्षीदाराचे अ.क्र.** | **पुराव्याचा तपशील** | **नाव** |
|---|---|---|
| **१.** | **नि क्र. ११** | **पंजाब विठ्ठल शिंदे,** |

आरोपीतर्फे तोंडी पुरावा देण्यात आलेला नाही.

**(अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे पुरावा निशाणी क्रमांक यादी)**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

आरोपीतर्फे लेखी पुरावा देण्यात आलेला नाही.

**(मुद्देमाल)**

| अ.क्र. | मुद्देमालाचे वर्णन | मुद्देमाल जप्त क्रमांक |
|---|---|---|
| १. | फॉर्चुनर गाडी नोंदणी क्र. एम एच १७ ए एस ५५७७ | -- |

**न्यायनिर्णय**

**(घोषित दिनांक ०६/०८/२०२६)**

आरोपी हे भारतीय दंड विधान कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ प्रमाणे संपरिक्षेस सामोरे जात आहेत.

**अभियोगपक्षातर्फे घटनेबाबत थोडक्यात हकीकत अशी की,**

**०२.** दि. ०७/०९/२०१७ रोजी १०.४० वा. चे सुमारास मौजे शिरगाव गावचे हद्दीत मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे रोडवर खबरी गणेश पंजाबराव देशमुख हा त्याची कार नोंदणी क्र. एम एच १४ एस सी.०२९८ ही मुंबई येथे भाडे सोडून मुंबई पुणे महामार्गाने पुणे बाजूकडे जात असतांना उर्से टोलनाक्याच्या पुढे शिरगाव गावचे हद्दीत गाडीच्या डाव्या बाजूकडील चाकाचा एक्सेलचा आवाज येऊ लागला. खबरीने गाडी थांबवण्यासाठी रोडच्या डाव्या बाजूस घेत असतांना एक ट्रक चालक ओव्हर टेक करुन पुढे निघून गेला. त्यामुळे खबरीस गाडी रोडच्या बाजूस घेता आली नाही. खबरीची कार समोरील फॉर्चूनर गाडी नोंदणी क्र. एम एच १७ ए एस ५५७७ हीस पाठीमागून ठोस बसून अपघात झाला व गाडीचा टायर फुटला. खबरीने गाडी थांबवली असता फॉर्चुनर गाडीमधील चालक अमिर उर्फ राजू शेख व इतर चार आरोपींनी बेकायदेशीर जमाव

जमविला व खबरीस हाताने मारहाण करुन नाकाचे हाड फ्रॅक्चर करुन दुखापत केली. सबब, खबरीने दि. ११/०९/२०१७ रोजी आरोपींविरुध्द खबर दिल्यानुसार **गुन्हा रजिस्टर क्रमांक. ३५७/२०१७** नुसार तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदवण्यात आला.

**गुन्ह्याचा तपास :**

**०३.** सदर गुन्हयाचा तपास एन. डी. साळूंखे पोलीस हवालदार यांनी केला. तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान मुद्देमाल जप्त केला, आरोपींना अटक केले. साक्षीदारांचे जबाब नोंदवले व आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपी यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**गुन्हयाचा तपशील व प्रतिकथन :**

**०४.** आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ अन्वये नि क्र. ०३ वर दोषारोपपत्र नोंदवण्यात आले. आरोपीने गुन्हा अमान्य केला व संपरिक्षेची मागणी केली. तसेच आरोपीचे निवेदन अनुक्रमे निशाणी ०४ ते ०८ वर गुन्ह्याचा तपशील नोंदवण्यात आला.

**आरोपीचा जबाब व त्यांचा बचाव :**

**०५.** आरोपींविरूद्ध अभिलेखावर पुरावा न मिळून आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

**पुरावा :**

**०६.** सरकार पक्षाने आपली कथने शाबीत करणेकरिता साक्षीदार सा. क्र. १ पंजाब विठ्ठलराव शिंदे याची साक्ष नि. क्र. ११ वर नोंदवली. साक्षीदार क्र. १ याने

अभियोगपक्षाच्या कथनास सहाय न केल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींनी त्याच्या बचावार्थ स्वतःची अथवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवली नाही.

**<u>युक्तीवाद :</u>**

**०७.** सुज्ञ सरकारी विधीज्ञ श्री. एस. एस. पवार यांनी असा युक्तीवाद केला की, साक्षीदार क्र. १ याने अभियोग पक्षाच्या कथनास सहाय न केल्यामुळे योग्य ते आदेश पारित करण्यात यावे असा युक्तीवाद केला. आरोपींचे विदवान वकिल श्री. जहागीरदार यांनी असा युक्तीवाद केला की, साक्षीदार क्र. १ याने अभियोगपक्षाच्या कथनास सहाय न केल्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करावी.

**<u>मुद्दे :-</u>**

**०८.** आरोपींवर ठेवण्यात आलेला दोषारोपपत्र, अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेला मौखिक पुरावा व दोन्ही पक्षांचा युक्तीवाद पाहता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले व त्यांचे निष्कर्ष व कारणे व अंतिम निर्णय मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, दि.०७/०९/२०१७ रोजी १०.४० वा.चे सुमारास मौजे शिरगाव गावचे हद्दीत फिर्यादी यांची कार नं. एम.एच.१४एस. सी. ०२९८ ही मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे रोडने पुणे बाजुकडे जात उर्से टोलनाक्याचे पुढे फिर्यादीने गाडी थांबवण्यासाठी रोडचे डावे बाजुस घेत असताना झालेल्या वादाचे कारणावरुन आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्तते करीता एकत्र जमुन बेकायदा | **नाही...** |

| | | |
|---|---|---|
| | जमाव केला. म्हणून त्यांनी **भा.द.वि. कलम १४३ सह कलम १४९** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | |
| २. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता फिर्यादीस हाताने, लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छा पुर्वक साधी दुखापत पोहोचवली व त्या योगे त्यांनी **भारतीय दंड विधान संहिता कलम ३२३ सह कलम १४९** प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नाही...** |
| ३. | वर नमुद तारखेला, वेळेला, ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता फिर्यादीस हाताने मारहाण करुन त्याच्या नाकाचे हाड फ्रॅक्चर केले व त्या योगे त्यांनी **भारतीय दंड विधान संहिता कलम ३२५ सह कलम १४९** अन्वये अपराध केला आहे काय ? | **नाही...** |
| ४. | काय आदेश? | **अंतिम आदेशा प्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**०९.** अभियोगपक्षाच्या कथनांनुसार दि. ०७/०९/२०१७ रोजी १०.४० वा. चे सुमारास मौजे शिरगाव गावचे हद्दीत मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे रोडवर खबरी गणेश पंजाबराव देशमुख हा त्याची कार नोंदणी क्र. एम एच १४ एस सी.०२९८ ही मुंबई येथे भाडे सोडून मुंबई पुणे महामार्गाने पुणे बाजूकडे जात असतांना उर्से टोलनाक्याच्या पुढे शिरगाव गावचे हद्दीत गाडीच्या डाव्या बाजूकडील चाकाचा एक्सेलचा आवाज येऊ लागला. खबरीने गाडी थांबवण्यासाठी रोडच्या डाव्या बाजूस घेत असतांना एक ट्रक चालक ओव्हर टेक करुन पुढे निघून गेला. त्यामुळे खबरीस गाडी रोडच्या बाजूस घेता

आली नाही. खबरीची कार समोरील फॉर्चूनर गाडी नोंदणी क्र. एम एच १७ ए एस ५५७७ हीस पाठीमागून ठोस बसून अपघात झाला व गाडीचा टायर फुटला. खबरीने गाडी थांबवली असता फॉर्चुनर गाडीमधील चालक अमिर उर्फ राजू शेख व इतर चार आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमविला व खबरीस हाताने मारहाण करुन नाकाचे हाड फ्रॅक्चर करुन दुखापत केली हे निःसंशयपणे शाबीत करणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u> :-**

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ पंजाबराव शिंदे (साक्षीदार क्र.१/नि.११) याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, त्याच्या मुलाची गाडी आरोपींच्या गाडीला ठोकल्यामुळे आरोपींनी त्याच्या मुलास मारहाण केली हे त्याला माहित नसल्याचे कथन केले. सरकार पक्षास सहकार्य न केल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याचा सखोलवार उलटतपास नोंदविला. मात्र, तरी देखील त्याने अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्य केलेले नाही.

**११.** सरकारपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सा. क्र. १ पंजाबराव शिंदे याने स्पष्टपणे नाकारले की, अपघाताच्या कारणावरुन आरोपींनी त्याच्या मुलास गंभीर मारहाण केली होती, आरोपींची नावे त्याला माहित नाही, तो आरोपींना ओळखू शकत नाही. पुढे त्याने पुराव्यात असे सांगितले की, त्याच्या मुलाचे अटॅकचे दोन ऑपरेशन झालेले असल्यामुळे तो पलंगावर पडून आहे व तो चालू फिरु शकत नाही.

१२. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये अ. सा. क्र. १ पंजाब शिंदे याने स्पष्टपणे मान्य केले की, त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नाही. तसेच त्याला व त्याच्या मुलाला आरोपींविरुध्द केस चालवायची नाही. त्याचा मुलगा कोर्टात येण्यास असमर्थ आहे.

१३. अ.सा. क्र. १ पंजाब शिंदे हा खबरी गणेश शिंदे याचे वडिल आहेत. असे असले तरी, खबरी गणेश शिंदे हा ऑपरेशन झाल्यामुळे कोर्टात येण्यास असमर्थ

असल्यामुळे व त्याचे वडील पंजाब शिंदे अ. सा. क्र. १ यांची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्यामुळे अभियोग पक्षाच्या एकंदरित कथना विषयी संशय निर्माण होतो. त्यामुळे सरकार पक्षाची केस निसंशयपणे शाबीत झालेली नाही. त्यामुळे वरील विवेचन विचारात घेता अभिलेखावर आरोपीस दोषी ठरवावे इतपत ठोस पुरावा उपलब्ध नसलेने आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.४ करीता खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. **आरोपी क्र. १ अमिर इलाई शेख, २ सागर विजय ओव्हाळ, ३ नवनाथ यशवंत लोखंडे,४ सुजित सुरेश भालेराव व आरोपी क्र. ५ स्वप्नील बाळासाहेब ओव्हाळ** यांची भारतीय दंड संहिता कलम १४२,१४३,३२३,३२४,३२५ सह कलम १४९ अन्वये गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी संहिता कलम ४३७ (अ) अन्वये रक्कम रु. २५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

४. गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक फॉर्चुनर गाडी नोंदणी क्र. एम एच १७ ए एस ५५७७ ही तिच्या मुळ मालकास परत दिली असल्यास त्याने त्याच्याच ताब्यात ठेवावी व अपिलीय कालखंड संपल्यानंतर न्यायालयामध्ये दिलेले बंधपत्र रद्द समजण्यात यावे. गाडी दिली नसल्यास मालकीचे कागदपत्रांची पुर्तता करुन परत देण्यात यावी.

५. सदर न्यायनिर्णय फौजदार प्रक्रिया संहिता कलम ३५३ (१) नुसार खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात येत आहे.

VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2026.08.06 17:06:48 +0530

**दि.०६/०८/२०२६**

**(श्री. व्ही.आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**वडगाव मावळ, पुणे.**

Visit ecourts.gov.in for updates or download mobile app "eCourts Services" from Android or iO

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original order.

Name of Steno : M. B. Ingole (Grade-III)
Court Name : Shri. V.R. Doifode, 4th
J.M.F.C. Vadgaon Maval, Pune.
Date of order : 06.08.2026
Order signed by P.O. on : 06.08.2026
Order uploaded on : 06.08.2026